MARATHI-(Code 109)
SAMPLE QUESTION PAPER
Class XII (2025-26)

वेळ : 3 तास एकूण गुण : 80

सर्व साधारण सूचना :

1. या प्रश्नपत्रिकेत A, B, C, D असे चार विभाग आहेत.
2. सर्व विभाग आवश्यक आहेत.
3. यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
4. एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग : A: वाचन व आकलन (15)

**प्रश्न 1) पुढील परिच्छेद लक्षपूर्वक वाचा आणि त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .( CBQ)**

माणसा खालोखाल मला निसर्ग प्रिय आहे. तशाच आवडत्या आहेत माझ्या बालपणाच्या आठवणी. त्यातूनही मला विषय मिळत गेले. माझ्या वाचनाला काही शिस्त नाही. लहान मोठे, बरेवाईट, भव्य-क्षुद्र सारे मला वाचायला आवडते. या वाचनातून काहीतरी अवचित डोळ्यांना दिसते. मनात घुसते आणि हो...माझ्या आवडत्या मांजरांनी तर अनेकदा मला लेखनाला विषय दिले आहेत. राजकारण आणि समाजकारण यात मला फारसा रस नाही त्यामुळे त्या विषयाचा मात्र माझ्या लेखनात अभाव आहे.

माझे बरेचसे ललित लेख वृत्तपत्रांतून सदर चालवताना लिहिले गेले आहेत. वृत्तपत्रात सदर चालवणे ही गोष्ट काही लेखकांना कमीपणाची वाटते. हे लेखन शाश्वत नसते, त्यात फक्त तात्कालिक घटना प्रसंगावरच लिहिले जाते, त्याला एक चुरचुरीत उथळपणा असतो, जीवनाचा सखोल तळ गाठण्याची त्या लेखनात कुवत नसते, आजचे वृत्तपत्रही उद्याची रद्दी असते, हे आणि तसेच कितीतरी आक्षेप वृत्तपत्रातल्या सदरावर घेतले जातात. त्यातल्या काहींमध्ये सत्याचा अंश असू शकेल. तरीही वृत्तपत्रात एखादे सदर नियमितपणे चालवणे, यात लेखकाला कमीपणा आणणारे काही आहे असे मला वाटत नाही. निदान माझा तरी असा अनुभव नाही. वाहत्या प्रवाहात अंग झोकून पाण्यावर तरंगताना पोहणा-याला जो अनुभव मिळतो, तोच आनंद असे मुक्त लेखन सातत्याने करताना मला लाभला आहे. ललित लेख लिहिण्यासाठी कोणते गुण आवश्यक असतात? पूर्व ग्रहरहितता, मनाचे डोळसपण, जीवनाबद्दलचे उदंड कुतूहल आणि कोणत्याही लहान मोठ्या गोष्टींना चटकन प्रतिसाद देणारी संवेदनक्षम वृत्ती यांची या लेखनाला फार आवश्यकता आहे असे मला वाटते. शिवाय लिहिण्याची हौस हवी आणि कष्टाची तयारी हवी.

अशा प्रकारच्या लेखनाची पहिली प्रेरणा पैसा मिळवणे ही असेल- नव्हे असतेच. पण तो काही त्याचा शेवट नव्हे. निर्मितीचा आनंद, आत्माविष्काराने लाभणारी तृप्ती, इतरांशी संवाद साधण्याची निकड हीच अशा लेखनाची खरी प्रेरणा, खरे पारितोषिक आहे. कवितेच्या खालोखाल ललित लेख हा माझा आवडता वाङ्मयप्रकार आहे. त्याचेही कारण हेच असावे.कारण कविता लिहिताना जे समाधान मला मिळते तीच तृप्ती या ललित लेखनानेही अनेकदा मला दिली आहे.

**प्रश्न : 1.A)** खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा.(3 x 1= 3)

I] लेखिकेच्या लेखनात कोणत्या विषयाचा अभाव आहे ?

a) तत्कालिक घटना

b) राजकारण आणि समाजकारण

c) निसर्ग

d) बालपणाच्या आठवणी

II] कोणते लेखन शाश्वत नसते ?

a) वृत्तपत्रातील सदर

b) ललित लेख

c)निसर्गपर लेखन

d) कविता

III] 'शाश्वत' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द आहे ...

a) चिरकाल

b) चिरंतन

c) चिरायु

d) क्षणिक

**प्रश्न 1.B)** पुढील प्रश्नांची 15 / 20 शब्दांत उत्तरे लिहा. (2X2= 4)

I] ललित लेखनासाठी कोणते गुण आवश्यक असतात ?

II] ललित लेखनाच्या ख-या प्रेरणा कोणत्या ?

**प्रश्न 1.C)** पुढील प्रश्नाचे उत्तर सुमारे 40 / 45 शब्दांत लिहा. (1x3 = 3)

I] वृत्तपत्रात सदर चालवणे काही लेखकांना कमीपणाचे का वाटते?

**प्रश्न 2 : खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा. (CBQ)**

अन्याय घडो कोठेही
चिडून उठू आम्ही,

घाव पडो कोठेही
तडफडू आम्ही.
हाल पाहून हळहळू
होवोत कोठेही,
पिळणूक पाडील पीड आम्हा
असो कुणाचीही.
वजन आमच्या छातीवर
पायातल्या बेड्यांचे दासांच्या,
वळपाठीवर आमच्या
चाबूक उठो कुठेही.
अवघ्या अभाग्यांचे अश्रू
उभे आमच्या डोळ्यात,
दुःखितांच्या वेदनांच्या
कळा उरात आमच्याही.
संवेदना सा-या जगाची
हृदयात आहे भरभरून,
नाते नवीन असे काही
जोडून आहोत आम्ही
मानव तेही मानव आम्ही.

**प्रश्न 2.A) खालील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्याया मधून निवडून लिहा. (2X1= 2)**

I] कवी कशाने हळहळतो ?

a) दुस-याचे सुख पाहून

b) प्रेम पाहून

c) मानवता पाहून

d) दुस-याचे हाल पाहून

II] कवीने प्रत्येक हृदयाशी कोणते नाते जोडले आहे ?

a)मित्रत्वाचे

b)मानवतेचे

c)शत्रुत्वाचे

d)गुलामाचे

**प्रश्न 2.B) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (3 x1= 3)**

I] कवी छातीवर कशाचा भार पेलतो ?

II] कवीच्या डोळ्यात कोणाचे अश्रू उभे आहेत ?

III] कवीच्या पाठीवर कशाचे वळ उठतात ?

**विभाग B: लेखन (15) (CBQ)**

**प्रश्न 3 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 300 ते 325 शब्दांत निबंध लिहा.**(1x10=10)
( आवश्यकता वाटल्यास दिलेल्या मुद्द्यांचा आधार घ्यावा.)
I] आजच्या विद्यार्थ्यांचे मनोगत मुद्दे ?
(आजचा विद्यार्थी ... त्याचे ध्येय...शैक्षणिक वातावरण .... शिक्षक व शाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन.... आपले आदर्श... माता –पित्याचा मानसिक दबाव .. जीवन मुल्यांवर निष्ठा ... प्रयत्न इ.)
II] मी पाहिलेले मराठी साहित्य संमेलन
(संमेलन बघण्याचा योग.... कार्यक्रमाची रुपरेषा ...आनंदोत्सव .... पुस्तकातील लेखक.कवी यांचे दर्शन / भेट .. कवी संमेलन..वैचारिक उद्बोधन ... पुस्तकांच्या स्टॉल्सना भेट ... निरोपाचा दिवस ..अविस्मरणीय क्षण .. इ.)
III] राष्ट्रीय विकासात युवकांची भूमिका
(आजची युवा .. देशाचा आधारस्तंभ... राष्ट्र विकासाची कल्पना ... त्याच्यापुढील आव्हाने ... सामाजिक राजकीय परिस्थिती....जन्मदात्री आई व जन्मभूमी यांचे स्थान ... ध्येय निश्चिती ... त्यासाठी प्रयत्न ... चांगले आदर्श निर्माण करणे ... इ. )
IV] जगातील पेट्रोल संपले तर ...
अनेक क्षेत्रात वापर .... पेट्रोलवर आधारित उद्योगधंद्यांना खीळ ....वाहनांची गर्दी कमी ...शेतीवर परिणाम ... शेतीची साधने ... कीटकनाशके... जंतुनाशके निर्मिती... रस्त्यांचे डांबरीकरण इ.वर परिणाम ...पण प्रदूषण कमी ... पेट्रोल उत्पादक देशांची आर्थिकस्थिती .... तेलावरून होणारी युद्धे/ स्पर्धा कमी.... जागतिक दळणवळणाची समस्या .... पर्यायी इंधन .. ? इ.

**प्रश्न. 4.खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा .(लिफाफा आवश्यक) (1x5 = 5)**
तुम्ही देवा/ देविका मानेकर संत गजानन नगर, अकोला 443403. असून तुमच्या भागात पिण्याच्या पाण्याचा अशुद्ध पाणी पुरवठा होत आहे. यासंबंधी महापालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्याकडे तक्रार करणारे पत्र लिहा.

**किंवा**

अनिल/ अनिता देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय, सांगली येथून ग्रंथपाल या

नात्याने ग्रंथालयासाठी मराठी नाटके व कादंबरी पुस्तकांची मागणी करणारे पत्र मल्हार बुक स्टोअर्स ,पुणे 400011 च्या व्यवस्थापकास लिहा.

## विभाग C : व्याकरण (25)

**प्रश्न 5 .सूचनांप्रमाणे उत्तरे लिहा.**

**5.A) पुढील शब्दापैकी योग्य समानार्थी शब्द ओळखा. ( कोणतेही तीन) (3x1 = 3)**

I] अदब

a) नम्रता b) राग

c) हेवा d) तिरस्कार

II] वासरमणी

a) लहान वासरू b) सूर्य

c) मुख्यमणी d) मोत्याची माळ

III] कवन

a) कादंबरी b) गद्य

c) काव्य d) प्रवासवर्णन

IV] दीन

a) श्रीमंत b) गरीब

c) दिवस d) प्रकाश

**5.B) योग्य पर्याय निवडून पुढील समास ओळखा. ( कोणतेही दोन) (2 x 2 = 4)**

I]खालील वाक्यातील अधोरेखित सामासिक शब्दाचा समास ओळखा?

<u>प्रतिक्षण</u> मोलाचा आहे.

a) कर्मधारय समास b) इतरेतर द्वंद्व

c) अव्ययीभाव समास d) विभक्ती तत्पुरुष समास

II] ‘जीवनशैली’ या सामासिक शब्दाचा समास आहे …….

a)अव्ययीभाव समास b) कर्मधारय समास

c)द्वंद्व समास d)विभक्ती तत्पुरुष समास

III] यापैकी कोणते पद द्वंद्व समास आहे ?

a)यथाप्रमाण b) सूर्यास्त

c) झुणकाभाकर d)माहितीपत्रक

IV] यापैकी कोणते पद कर्मधारय समास आहे ?

a) पांढराशुभ्र b) मित्रमैत्रिणी

c) निसर्गसौंदर्य d) वृत्तपत्र

**5.C) पुढील वाक्यांचा सूचनेनुसार प्रयोग ओळखा किंवा बदला. [ कोणतेही 3] (3x 2=6)**

I] कर्तरी प्रयोगाचे वाक्य कोणते ते लिहा.

a) त्यांनी आम्हाला दृक्-श्राव्य दालनात नेले.

b) डॉक्टरांनी दात काढला.

c) विंचू डंख मारतो.

d) दातांनी माणसाला काय दिले आहे ?

II] 'विदुषकाने प्रेक्षकांना हसविले.'– या वाक्याचा प्रयोग आहे .......

a) कर्तरी प्रयोग b) भावे प्रयोग

c) भावकर्तरी d) कर्मणी प्रयोग

III] सैनिक शत्रूला रोखतात. ( भावे प्रयोग करा.)

IV] मी हलकेच खिडकी उघडतो. (कर्मणी प्रयोग करा .)

**5.D) वाक्यप्रकार ओळखा किंवा सूचनेनुसार वाक्यप्रकार बदला. (कोणतेही 3) (CBQ) (3x 2=6)**

पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा.

I] सुट्टी मिळाली का ?

II] शिक्षणाचा आनंद कधी संपत नाही.

III] किती मनापासून हसतात ती लहान मुलं !' – या वाक्याचे विधानार्थी वाक्य आहे .....

a) ती लहान मुलं खूप मनापासून हसतात.

b) ती लहान मुलं मनापासून हसतात का ?

c) त्या लहान मुलांनी खूप मनापासून हसावे .

d) लहान मुलांनो, मनापासून हसा.

IV] ‘पावसाने काय कमी नुकसान झाले का?’ – याचे होकारार्थी वाक्य असेल ....

a) किती नुकसान केले या पावसाने !

b) पावसाने खूप नुकसान झाले

c) पावसाने काहीच लाभ मिळाला नाही.

d)पावसाने खूप नुकसान होऊ नये.

**5.E)पुढे काही वाक्ये दिली आहेत. त्या वाक्यांत कंसात दिलेल्या वाक्प्रचारांपैकी योग्य त्या वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही तीन) (CBQ) (3x2 = 6)**

(मर्दुमकी गाजवणे, दातखीळ बसणे, शंख करणे, चारीमुंड्या चीत होणे,नक्षा उतरवणे,)

I) पंडित महोदयांचे नवतरुणाने <u>गर्वहरण केले.</u>

II) शे-सव्वाशे मावळ्यांच्या पराक्रमा पुढे मुघलांची बलाढ्य सेनाही <u>पराभूत झाली.</u>

III) या युद्धात हंबीररावांनी खूप मोठा <u>पराक्रम केला.</u>

IV) ती अवाढव्य काळी आकृती पाहून उषा काकूला <u>खूप भीती वाटू लागली</u>.

## विभाग : D : गद्य–पद्य पाठ आणि उपयोजित लेखन ( 25 )

**<u>प्रश्न 6: गद्य-पाठांधारे</u> पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**<u>6:</u>.A) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. [ कोणतेही 2] (2x1 =2)**

I]आनंदी आयुष्यासाठी सोपे तत्त्व म्हणजे ....

a )पुस्तके वाचा b)यश, वैभव मिळवा.

c)आपल्या आवडीचे काम निवडा. d)आपल्या मुलांच्या इच्छा पूर्ण करा.

II] पहाटे सर्वात आधी जाग येते ती बागेतील ......

a) पाखरांना b) मोगऱ्याला

c) दोन चाफ्यांना d) वेलींना

III] आज गावातील प्रत्येकजण आनंदित होता कारण............

**a**) गावात शाळा आली **b**) गावात बापू गुरुजी आले

**c**) गावाला साजरं गाव म्हणून मान मिळाला **d**) नदीला पूर आला

**<u>6:</u>.** B**) पुढीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची प्रत्येकी सुमारे 35/40 शब्दांत उत्तरे लिहा**. **(2x2=4)**

I]बापू गुरुजींनी सत्कारातून मिळालेल्या पैशांचे काय केले ?

II] एकटेपणाचेही कोणते फायदे लेखक शिवराज गोर्ले सांगतात ?

III] द्रास, कारगिल आसमंतात भाग्यश्रीला कोणता सुगंध जाणवत होता ?

IV] पाखरे आणि पहाट यांचं नातं लेखकाने कसे सांगितले आहे ?

**<u>6:</u>.**C**) पुढील पैकी कोणत्याही <u>दोन प्रश्नांची उत्तरे</u> सुमारे 70 / 75 शब्दांत लिहा. (2x 3=6)**

I]यु. म. पठाण पहाटेच्या वेळी आपल्या बागेतील वेली, फुलांशी कसे रममाण झाले होते ?

II] ब्रिगेडियर कुशल ठाकूर यांनी लेखिकेशी बोलताना कोणते विचार व्यक्त केले ?

III] शिवराज गोर्ले यांच्या मते वाचनाचा आनंद कसा असतो ?

**प्रश्न 7.A**) **<u>पद्य पाठांच्या</u> आधारे योग्य पर्याय निवडून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. [ कोणतेही 2] (2x1=2)**

I]कवी आषाढातील मेघांना थांबायला सांगत आहे, कारण .......

a) हे आषाढघन थांबले नाहीत तर पूर येईल.

b) आषाढातील पाऊस थांबला तर शेतातील कामे करता येतील.

c) या आषाढघनांमुळे निर्माण झालेले निसर्ग सौंदर्य डोळे भरून पहायचे आहे.

d) या आषाढातील पावसाचा कंटाळा आला आहे

II]कवी सुरेश भट यांना ...... झळा लागतात.

a) दुःखाच्या b) सावल्यांच्या

c )उन्हाच्या d)शत्रूच्या .

III] कामक्रोध विंचू चावला .... घाम अंगासी आला ||

a) खूप b) मम

c) तम d) दारूण

7 B**) कोणत्याही <u>दोन प्रश्नांची</u> सुमारे** 35/40 **शब्दांत उत्तर लिहा**. **(2x 2=4)**

I] आरशातील स्त्रीचे पूर्व रूप कसे होते ?

II] कवी सुरेश भट ‘माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी’ असे का म्हणतात ?

III] ‘रोज मातीत’ या कवितेतील शेतकरी स्त्री कोण कोणती कामे करते ?

**7.C) पुढीलपैकी एका काव्यपंक्तीचा भावार्थ सुमारे 70/75 शब्दांत लिहा. (CBQ) (1x4= 4)**

I] कोमल पाचूंची ही शेतें प्रवाळ माती मधली औते

इंद्रनीळ वेळूंची बेटें या तुझ्याच पदविन्यास खुणा.

**किंवा**

सत्त्व उतारा देऊन | अवघा सारिला तमो गुण |

किंचित राहिली फुणफुण | शांत केली जनार्दने ||

**प्रश्न 8 . पुढील प्रश्नाचे 60 / 65 शब्दांत उत्तर लिहा. (1x 3=3)**

I) माहिती पत्रकाचे स्वरूप सांगून याची गरज का असते ते लिहा?

**किंवा**

मुलाखतीचा समारोप कसा असावा?

*******************